जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळ

# श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर

● आर्टस ● कॉमर्स ● सायन्स ● बीबीए ● बीसीए ●

---

## विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

## ऑनलाईन नाव नोंदणी करणे, ऑनलाईन मेरीट फॉर्म व प्रवेश अर्ज भरणे, प्रवेश अर्जाची प्रत, कागदपत्र आणि शुल्क कार्यालयात जमा करणे.

### ● प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी (Online Registration) करणे प्रक्रिया:

१. विद्यार्थ्याने नव्याने ऑनलाईन प्रवेश घेताना ऑनलाईन नाव नोंदणी करण्यासाठी व अर्ज भरण्यासाठी मोबाइल फोनचा वापर करू नका. कृपया डेस्कटॉप किंवा लॅपटॉप वापरूनच ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी.

२. प्रथमच ऑनलाईन प्रवेशासाठी फॉर्म भरत असलेल्या विद्यार्थ्यांनी खालील वेबसाइटला भेट देऊन ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी.

https://sscollegejunnar. com/online-admission/#

३. ऑनलाईन नाव नोंदणी करण्यासाठी खालील लिंकवर भेट देऊन विद्यार्थ्याने बिनचूक नाव नोंदणी प्रकीया पूर्ण करावी.

https://sscj.vriddhionline.com/Login_2StudRegister_OCMS2.aspx

४. विद्यार्थ्याने नाव नोंदणीसाठी वैध ई-मेल आयडी, वैध मोबाईल नंबर, विद्यार्थ्याची जन्मतारीख (DD/MM/YYYY) व लक्षात ठेवता येणारा पासवर्ड वापरावा. (पासवर्डमध्ये विशेष चिन्हे (#, !, $, &, .,) वापरू नका).

५. जर विद्यार्थ्याजवळ स्वतःचा मोबाईल नसेल आणि कुटुंबातील कोणाचा तरी मोबाईल वापरत असाल, तर फॉर्म भरण्याच्या वेळी तो मोबाईल स्वतः जवळ ठेवावा.

६. नाव नोंदणी करताना मोबाईल नंबर आणि ईमेल आयडीवर OTP पाठवला जाईल.

७. ईमेल आयडीवर एक सत्यापन (Verify करण्यासाठी) लिंक देखील पाठवली जाईल. कृपया त्या लिंकवर क्लिक करून ईमेल सत्यापित (verify) करा.

८. OTP फक्त 5 मिनिटे वैध राहतो. वेळेत OTP न वापरल्यास तो आपोआप कालबाह्य होतो. मोबाईलवर OTP न आल्यास, कृपया ईमेल तपासा. मिळालेला OTP योग्य ठिकाणी टाकून मोबाईल नंबरची सत्यता करा.

९. OTP सत्यापनानंतर (Verify केल्यानंतर) विद्यार्थ्याचे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी खाते सक्रिय होईल आणि त्याची पुष्टी ईमेल व SMS द्वारे मिळेल.

१०. विद्यार्थ्याला 10 अंकी Login User ID / Registration ID (नोंदणी क्रमांक) आणि Password विद्यार्थ्याच्या नोंदणीकृत मोबाईलवर मिळेल. कृपया विद्यार्थ्याने User ID / Registration ID आणि Password सुरक्षित ठेवावा.

११. जर विद्यार्थ्याकडून Login User ID किंवा Password विसरला, तर Login -> Forget ID किंवा Login -> Forgot Password वापरून तो परत मिळवता येतो.

१२. जर तुम्ही पूर्वीपासून Vriddhi पोर्टलवरून कोणत्याही कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेला असेल, तर पुन्हा नोंदणी करू नका.

१३. यशस्वी नोंदणीनंतर विद्यार्थी नवीन प्रवेशासाठी अर्ज करू शकतो.

## ● प्रवेशासाठी ऑनलाईन मेरीट फॉर्म (Online Merit Form) भरणे प्रक्रिया:

१. प्रत्येक विद्यार्थ्याने एकाच वर्गासाठी एकच अर्ज सादर करावा. जर एका वर्गासाठी एकापेक्षा जास्त अर्ज सादर केल्यास, ते रद्द करण्यात येतील.

२. विद्यार्थ्याने ऑनलाईन मेरीट फॉर्म भरण्यासाठी खालील वेबसाईटवर क्लिक करून ऑनलाईन मेरीट फॉर्म भरणे प्रक्रिया पूर्ण करावी.
https://sscj.vriddhionline.com/Login_1StudLogin_OCMS2.aspx

३. विद्यार्थ्याला मिळालेल्या 10 अंकी Login User ID / Registration ID (नोंदणी क्रमांक) आणि Password चा वापर करून आपल्या खात्यात प्रवेश करावा.

४. ऑनलाईन मेरीट फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्याने शेवटच्या वर्षाच्या निकालामधील एकूण गुण, मिळालेले गुण, उत्तीर्ण झालेला महिना व वर्ष आणि बैठक क्रमांक, मागील वर्षी शिकत असलेले शाळा अथवा महाविद्यालयाचे संपूर्ण नाव व पत्ता, स्वतःचे नाव, वडिलांचे व आईचे नाव, पत्ता, जन्मतारीख, जात, मोबाईल क्रमांक, आणि ईमेल आयडी इत्यादी माहिती बिनचूक भरावी.

५. विद्यार्थ्याने मेरीट फॉर्मची ऑनलाईन भरलेली माहिती व्यवस्थित तपासून पहावी आणि त्यानंतरच सबमिट बटन दाबावे.

६. विद्यार्थ्याने ऑनलाईन भरलेल्या मेरीट फॉर्मच्या दोन प्रिंट काढाव्यात आणि त्यापैकी एक प्रत महाविद्यालयाच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत जमा करावी तसेच दुसरी प्रत स्वतः जवळ जतन करून ठेवावी.

७. महाविद्यालयाने जाहीर केलेल्या मेरीट लिस्टनुसार लागलेल्या नंबरनुसार विद्यार्थ्याने ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी कार्यवाही करावी.

## ● प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज (Online Admission Form) भरणे प्रक्रिया:

१. विद्यार्थ्याने नवीन प्रवेशासाठी ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी खालील कागदपत्र स्वत:जवळ ठेवावीत:
   - मेरीट फॉर्मची झेरॉक्स,
   - नाव नोंदणी करण्यासाठी वापरलेला मोबाईल व ईमेल आयडी
   - विद्यार्थ्याने नाव नोंदणी (Online Registration) करताना मिळालेला 10 अंकी Login User ID / Registration ID (नोंदणी क्रमांक) आणि Password.
   - प्रवेश समितीने विषय निश्चित करून व सही करून दिलेला ऑफलाईन फॉर्म.
   - पालकांचा (आई / वडील / भाऊ / बहिण) मोबाईल क्रमांक (विद्यार्थ्याने नाव नोंदणी करण्यासाठी वापरलेल्या मोबाईल क्रमांक सोडून दुसरा मोबाईल क्रमांक).
   - विद्यार्थ्याची डिजिटल स्वाक्षरी.
   - विद्यार्थ्याचा पासपोर्ट साईज फोटो (०२ प्रतीत).
   - मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या वर्गाची निकाल/गुणपत्रकाची (Marklist) मूळ प्रत (Original) व झेरॉक्स प्रत.
   - शाळा सोडल्याच्या दाखल्याची (Leaving Certificate) मूळ प्रत (Original) व झेरॉक्स प्रत.
   - आधार कार्डची झेरॉक्स प्रत.
   - विद्यार्थ्याचा बँकेचा खाते क्रमांक (नसल्यास पालकांचा बँक खाते क्रमांक).
   - जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत (लागू असल्यास).
   - अपंग विद्यार्थ्यासाठी अपंगत्वाच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.
   - शैक्षणिक खंड असल्यास Gap Certificate.

२. महाविद्यालयाने जाहीर केलेल्या मेरीट लिस्टमध्ये, विद्यार्थ्याने आपले नाव, अनुक्रमांक, अनुदानित / विनाअनुदानित तुकडीचा तपशील व्यवस्थित तपासून पहावा व त्यानंतरच ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

३. विद्यार्थ्याने ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी, महाविद्यालयातील कार्यालयातून प्रवेश अर्जाचा नमुना (ऑफलाईन फॉर्म) आणि माहिती पुस्तिका घ्यावी.

४. विद्यार्थ्याने ऑफलाईन फॉर्ममध्ये माहिती पुस्तिकेच्या आधारे संपूर्ण माहिती बिनचूक भरावी.

५. विद्यार्थ्याने ऑफलाईन फॉर्ममध्ये विषय निवडताना प्रवेश समितीमधील प्राध्यापकांचे मार्गदर्शन घेऊनच विषय भरावेत.

६. ऑफलाईन फॉर्म संपूर्ण भरल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश समितीमधील प्राध्यापकांना सदर फॉर्म दाखवून त्यावर प्रवेश समितीमधील प्राध्यापकाची सही घेणे अनिवार्य आहे. (कोणत्याही विद्यार्थ्याने परस्पर कोणीही विषय निवड करून ऑनलाईन फॉर्म भरू नये.)

७. ऑफलाईन फॉर्मवर प्रवेश समितीमधील प्राध्यापकाची सही झाल्यानंतर, विद्यार्थ्याने ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरावा.

८. ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्यासाठी महाविद्यालयाने परिसरामध्ये विद्यार्थी सुविधा केंद्राची सुविधा केलेली आहे, सर्व विद्यार्थ्यांनी फॉर्म बिनचूक पद्धतीने भरण्यासाठी सदर सुविधा केंद्राचा वापर करावा.

९. विद्यार्थ्याने ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्यासाठी आपल्याला दिलेल्या 10 अंकी Login User ID / Registration ID (नोंदणी क्रमांक) आणि Password चा वापर करून पुढील लिंकवर https://sscj.vriddhionline.com/Login_1StudLogin_OCMS2.aspx क्लिक करून लॉगीन करावे.

१०. त्यानंतर आपल्याला ज्या वर्गासाठी प्रवेश घ्यावयाचा आहे त्या पर्यायावर क्लिक करून विचारलेली सर्व माहिती (स्वत:बद्दलची माहिती, मागील वर्षाची शैक्षणिक माहिती, विषयांची निवड, इ.) बिनचूक भरावी.

११. अर्ज भरण्यापूर्वी स्वाक्षरी, फोटो आणि आवश्यक कागदपत्रांच्या स्कॅन कॉपीज तयार ठेवाव्यात. प्रत्येक फाइल 500 KB पेक्षा कमी असावी आणि *.JPEG किंवा *.JPG फॉरमॅटमध्ये स्वतंत्र अपलोड करावी.

१२. ऑनलाईन भरलेल्या प्रवेश अर्जाची प्रिंट काढून त्यावर नेमून दिलेल्या ठिकाणी विद्यार्थ्याने व पालकांनी स्वाक्षरी करावी.

१३. तसेच सदर फॉर्मवर प्रवेश समितीमधील प्राध्यापकाची सही घ्यावी. सदर प्राध्यापक ऑफलाईन फॉर्मवरील व ऑनलाईन भरलेल्या प्रवेश अर्जावरील माहिती (विषयांची निवड) पडताळून पाहतील व त्यानंतरच सही देतील.

- **प्रवेश अर्ज (Admission Form), कागदपत्रे व शुल्क कार्यालयात जमा करणे प्रक्रिया:**

१. विद्यार्थ्याने आपला प्रत्यक्ष प्रवेश विहित वेळेत अनुदानित / विनाअनुदानित तुकडीमध्ये निश्चित करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या प्रवेश अर्जासह खालील कागदपत्रांची पूर्तता करावी:

- ✓ मेरीट फॉर्मची झेरॉक्स,
- ✓ प्रवेश समितीने सही करून दिलेला ऑफलाईन फॉर्म
- ✓ ऑनलाईन भरलेल्या प्रवेश अर्जाची प्रिंट (त्यावर विद्यार्थ्याची व प्रवेश समिती सदस्याची सही असणे आवाश्यक)
- ✓ दोन पासपोर्ट साईज फोटो,

- ✓ मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या वर्गाची निकाल/गुणपत्रकाची (Marklist) मूळ प्रत (Original) व झेरॉक्स प्रत
- ✓ शाळा सोडल्याच्या दाखल्याची (Leaving Certificate) मूळ प्रत (Original) व झेरॉक्स प्रत,
- ✓ आधार कार्डची झेरॉक्स प्रत,
- ✓ जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत (लागू असल्यास),
- ✓ अपंग विद्यार्थ्यासाठी अपंगत्वाच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत (लागू असल्यास),
- ✓ शैक्षणिक खंड असल्यास Gap Certificate

२. विद्यार्थ्याने ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या प्रवेश अर्जासोबत वरील सर्व कागदपत्र जोडून महाविद्यालयाने नेमून दिलेल्या प्रवेश शुल्कासह कार्यालयीन वेळेत जमा करणे अनिवार्य आहे.

३. टीप: विद्यार्थ्याने प्रवेश अर्जासोबत दिलेल्या मूळ कागदपत्रांच्या (उदा. १२ वी निकाल, शाळा सोडल्याचा दाखला, इ.) स्वत:कडे जास्त प्रतीत झेरॉक्स करून ठेवाव्यात.

**टीप:**

1. या सूचनांमध्ये कोणतीही पूर्वसूचना न देता बदल होऊ शकतात. त्यामुळे नवीन अपडेट्स वेळोवेळी तपासा.
2. तुमचा सक्रिय मोबाईल नंबर आणि वैध ईमेल आयडी हे कॉलेजकडून ऑनलाईन लेक्चर्स व उपस्थिती संबंधित सूचना पाठवण्यासाठी वापरले जातील.
3. अवैध मोबाईल नंबर किंवा ईमेल दिल्यास, ऑनलाईन उपस्थिती नसल्याचे गणले जाऊ शकते. यास विद्यार्थ्यांनाच जबाबदार धरले जाईल.
4. जर मोबाईल नंबर बदलला असेल, तर लॉगिन केल्यानंतर प्रोफाईलमधून अपडेट करा आणि कॉलेजला याची माहिती द्या.